# त्रिवेणी

## नरहर कुरुंदकर

891.464
करुंद
82453

891.464
कुरुंद
82453

# राष्ट्रनिर्माता भगवान श्रीकृष्ण

आपल्या ज्या पुराणकथा आहेत, त्यांच्या अभ्यासाच्या वेगवेगळ्या अशा पद्धती आहेत. त्यांतील एक अशी की, पुराणकथा क्रमाने बनत कशी जाते, याचा अभ्यास करणे आणि ती बनत असताना एखाद्या संस्कृतीचा त्या कथेवर प्रभाव कसा पडतो व त्यातून ती आकार कशी घेते, याचा अभ्यास करणे. सगळ्या पुराणकथा या शतकानुशतके न सुटणाऱ्या निरनिराळ्या मानवी समस्यांच्या प्रतीककथा कशा आहेत, याचा अभ्यास करणे ही आणखी एक पद्धती आहे.

संस्कृतीच्या ओघात या पुराणकथा कित्येकदा बदलत जातात. मग चांगल्या माणसाची पुराणकथा ही वाईट माणसाच्या व वाईट माणसाची पुराणकथा ही चांगल्या माणसाच्या पुराणकथेत रूपांतरित होते. हाही एक अभ्यासाचा भाग आहे म्हणून मिथ अँड सिंबॉल, मिथ अँड क्रिएशन, मिथ डिस्टॉर्टेड, मिथ एलव्हेटेड असे हे सगळे पुराणकथेच्या अभ्यासाचे वेगवेगळे प्रकार असतात पुराणकथेच्या अभ्यासाचे जेवढे प्रकार आहेत, ते आपापल्या मर्यादेमध्ये महत्त्वाचे आहेत, असे मी स्वतः मानतो. काही पुराणकथा काही पद्धतीने अभ्यासणे सोयीचे जाते, काही पुराणकथा दुसऱ्या अभ्यासपद्धतीने अभ्यासाव्या लागतात. सगळ्याच पुराणकथा एकाच पद्धतीने अभ्यासता येतील, असे नाही. हा जो पुराणकथांचा विविध पद्धतींनी अभ्यास चालू आहे, त्यामागे या सगळ्या पुराणकथांच्या मागे असलेला इतिहास शोधणे ही एक पुराणकथेच्या अभ्यासाची पद्धती आहे. म्हणून मिथ डिस्टॉर्शन कसे होते, याचे उदाहरण म्हणजे ययातीची कथा. आणि 'पुराणकथेकडून इतिहासाकडे' याचे उदाहरण म्हणून श्रीकृष्णाच्या कथेचा उल्लेख करणार आहे. अर्थात् ज्या वेळी पुराणकथेकडून इतिहासाकडे आपण जातो, त्या वेळी आपली विचार करयाची, अभ्यासाची सगळी पद्धतीच बदलून जाते, कारण पद्धतीचा हेतू बदलून



जातो.

श्रीकृष्णासंबंधी अलीकडे वेगवेगळ्या मंडळींनी वेगवेगळ्या रीतीने विचार मांडायला सुरुवात केली आहे. माझे काही कम्युनिस्ट मित्र आहेत. त्यांच्या डोक्यात मातृसत्तेचे एक प्रचंड असे वेड आहे. त्यांना प्राचीन भारतात जागोजाग मातृसत्ताक पद्धती दिसायला लागतात. यादवांची राजवट ही मातृसत्ताक होती, असे आमच्या काही कम्युनिस्ट मित्रांनी मोठ्या तपशीलाने रंगवले आहे. यादवांची राजवट ही खरेच मातृसत्ताक आहे का, या प्रश्नाच्या निमित्ताने जो कृष्णचरित्राचा अभ्यास करावा लागला, त्यावरून मी या निर्णयापर्यंत येऊन पोचलो आहे की, यादवांची राजवट ही मातृसत्ताक असल्याचा कुठलाही पुरावा नाही! म्हणून यादवांची राजवट मातृसत्ताक होती, हे गृहीत धरून जेवढे काही विवेचन केले आहे, ते विद्वत्ताप्रचुर आहे, पण त्याचा आमच्या पुराणकथेशी काहीही संबंध नाही! आणि जर आमच्या पुराणकथेशी याचा काहीही संबंध नसेल, तर मग या श्रीकृष्णाच्या चरित्राकडे एका विश्लेषणाच्या पद्धतीने पहायचे असेल तर कसे पहावे लागेल?

श्रीकृष्णाचे लोकविलक्षण असे चरित्र आपल्या सर्वांसमोर आहे. या चरित्रावरून जर आपण ठरवले की, श्रीकृष्णाच्या विरोधी बोलायचे, तर त्यासाठी कोणतीही नवीन कल्पना आपल्याला आपल्या डोक्यातून काढावी लागत नाही. ती सगळी आमच्या ऋषी-मुनींनी त्या चरित्रात नोंदवून ठेवलेली आहे. बेजबाबदारपणे श्रीकृष्णाविषयी बोलायचे असे म्हटले, तर मग सगळे सांगता येणे शक्य आहे. हा जो श्रीकृष्ण नावाचा देव आहे तो अतिशय लबाड आहे. लबाड्या करणे हा याचा जन्मभराचा उद्योग राहिला. बालपणापासून हा जो लबाड्या करीत राहिला, तो मरेपर्यंत लबाड्याच करीत राहिला व शेवटी मेला! लबाडी करतानाच हा वाढला, लबाडी करतानाच मेला. हा इतका लबाड असतानासुद्धा हिंदूंनी त्याला देव मानले. इथून पुढचे विवेचन जितके वाढवायचे असेल, तेवढे वाढवता येईल. तेव्हा लबाडीच्या संदर्भात श्रीकृष्णाच्या चरित्राचे विवेचन करता येते. लबाडीबरोबर चोरीच्या संदर्भातही विवेचन करता येते. कारण गोकुळचा चोर म्हणून तर श्रीकृष्णाची प्रसिद्धीच आहे. तेव्हा श्रीकृष्णाच्या चरित्रामध्ये चोऱ्या आहेत, लबाड्या आहेत. त्याचबरोबर गोपिका आहेत, रासक्रीडा आहेत, म्हणून व्यभिचार आहे. मी जर एका चौकात बासरी वाजवत रात्री उभा राहिलो आणि अपेक्षा केली की, आजूबाजूच्या घरांतील सर्व बायकांनी आपले कामधंदे सोडून बाहेर यावे तर बायका येतील की नाही शंका आहे, पण अशी अपेक्षा केल्याबद्दल लोक मला मारतील, पण भगवान श्रीकृष्णाने तसे केले तर त्याचे चरित्र पुण्यमय होऊन जाते.

एखादा कम्युनिस्ट कवीसुद्धा श्रीकृष्ण चरित्रावर कविता लिहीत असताना

अत्यंत तन्मय होऊन 'आज गोकुळात श्रीकृष्ण होळी खेळायला लागला आहे, म्हणून राधिके, तू जरा जपून घरी जा.' असे म्हणतो. 'आज गोकुळात रंग खेळतो हरी! राधिके, जरा जपून जा तुझ्या घरी' ही सुरेश भटांची कविता आहे! श्रीकृष्ण-चरित्रात व्यभिचार आहे, रंगेलपणा आहे, चोऱ्या आहेत, लबाड्या आहेत, म्हणून श्रीकृष्णाच्या चरित्राविषयी जर थोडेसे बेजबाबदारपणे बोलायचे व श्रीकृष्णाची थट्टा करायची, त्याचे विडंबन करायचे, त्याची विटंबना करायची ठरले, तर त्यातील एकही मुद्दा आपल्याला आपल्या कल्पनेतून काढायची गरज नाही. हे सगळेच्या सगळे मुद्दे आपल्याला आपल्या पवित्र परंपरेने नोंदवूनच ठेवलेले दिसतील. कुठे बाहेर जाण्याची गरज नाही.

अडचणीची गोष्ट वेगळी आहे. श्रीकृष्णाच्या चरित्रामध्ये चोऱ्या आहेत, व्यभिचार आहे, लबाड्या आहेत, सोळा हजार एकशे आठ बायका आहेत, त्याचप्रमाणे श्रीकृष्णचरित्रांत तत्त्वज्ञान नावाचाही एक भाग आहे. श्रीकृष्ण हा जसा गोकुळचा चोर आहे, तसा भगवद्गीतेचा प्रवक्ताही आहे. भारताच्या इतिहासामध्ये 'भगवद्गीता' या ग्रंथाचे प्राचीन वेदांततत्त्वज्ञानाच्या दृष्टीने तर महत्त्व आहेच; मग तुम्ही शैव असा, वैष्णव असा; द्वैती असा, अद्वैती असा, विशिष्टाद्वैती असा, वा भेदाभेदवादी असा किंवा त्या भेदाभेदवादाचा एक तुकडा म्हणून अचिंत्यभेदाभेदवादी असा, या सर्वांना 'भगवद्गीता' प्रमाण आहे! 'भगवद्गीते'चे आमच्या सगळ्या धर्मपरंपरेत महत्त्व आहेच, पण आधुनिक भारताच्या सगळ्या राजकीय परंपरेत सुद्धा भगवद्गीतेचे महत्त्व आहे.

तात्या टोपे यांना 'भगवद्गीता' हातात घेऊन फासावर लटकण्याची कोठून बुद्धी झाली हे काही सांगता येणे शक्य नाही. तिथून एक एक माणूस 'भगवद्गीते'च्या नादी लागलेला आहे त्यात तात्या टोपे आहेत, लोकमान्य टिळक आहेत, महात्मा गांधी आहेत, अगदी आचार्य विनोबा भावे यांच्यापर्यंत सगळे आहेत. सध्याच्या पतप्रधानांनासुद्धा 'भगवद्गीता' मधून मधून वाचण्याचा नाद आहे. कोणावर 'भगवद्गीते'चा किती परिणाम होतो, हा विवाद्य विषय आहे. पण आमच्या सगळ्या समाजकारणात, धर्मकारणात, राजकारणात, राष्ट्रकारणात, तत्त्वज्ञानात, स्वातंत्र्याच्या लढ्यात 'भगवद्गीता'या ग्रंथाला लोकविलक्षण असे महत्त्व आहे. या गीतेचा प्रवक्ताही भगवान् श्रीकृष्ण आहे. म्हणजे श्रीकृष्णचरित्रात जशा चोऱ्या आहेत, लबाड्या आहेत, व्यभिचार आहे, त्याचबरोबर सगळ्या राष्ट्राला हजारो वर्षे अध्यात्मसाधना, नैतिकसाधना, स्वातंत्र्याची साधना करण्यासाठी आधारभूत असणारा जो ग्रंथ, त्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रवक्ताही भगवान श्रीकृष्ण आहे!

हा श्रीकृष्ण निष्णात लढवय्या आहे, अत्यंत पराक्रमी आहे; शत्रूंचा वध करणारा, नाश करणारा आहे. या दृष्टीने कृष्णाचे चरित्र आपल्या डोळ्यांसमोर आहे. पण एवढा मोठा लढवय्या असून देखील हत्यार सोडून देऊन केवळ रथाचे घोडे हाकीत युद्धाचे मार्गदर्शन करणारा सुद्धा आहे, शस्त्र ग्रहण करणारा कृष्ण आपल्या डोळ्यांसमोर आहे, तसेच शस्त्रत्याग करणारा म्हणूनही आहे. कंसाचा वध करणारा म्हणूनही श्रीकृष्ण आपल्या डोळ्यांसमोर आहे. स्वतःच्या ताकदीच्या जोरावर साम्राज्ये उलथी-पालथी करणारा म्हणूनही कृष्ण आपल्या डोळ्यांसमोर आहे आणि कोणत्याच साम्राज्याचा मोह न धरणारा म्हणूनही कृष्ण आपल्या डोळ्यांसमोर आहे. म्हणून तो असा भोगविलासाचा प्रतिनिधी आहे, तसा सर्व अनासक्ती, वैराग्य आणि संयम यांचा प्रतिनिधी म्हणूनही आहे. म्हणून श्रीकृष्ण-चरित्राविषयी बेजबाबदारपणे बोलायचे ठरले, तर पुष्कळ आहे, पण जबाबदारीने बोलायचे ठरवले, तर काय बोलायचे, याच्याविषयी चिंता करण्यासारखे देखील पुष्कळ आहे. असे हे श्रीकृष्णाचे लोकविलक्षण चरित्र आपल्या डोळ्यांसमोर आहे.



श्रीकृष्णाचे चरित्र भारतातल्या सर्व सांस्कृतिक जीवनाला आधारभूत म्हणून आहे. सांस्कृतिक जीवनाला आधारभूत आहे, याचा अर्थ असा की, आमच्या नाटकांना, नृत्यांना, नानाविध चालीरीतींना, व जवळपास ज्याला आपण उत्तरभारतीय संगीत म्हणतो त्यातील अर्ध्या ध्रुपदांना, ख्यालांना, ठुमरींना, कजरींना (गझल मी म्हणत नाही) या सर्व शास्त्रीय संगीताच्या प्रकारांना श्रीकृष्णचरित्राचा आधार आहे आणि भारतीय चित्रकलेचे मध्ययुगातले जे प्रमुख संप्रदाय आहेत, त्या प्रमुख संप्रदायांत तुम्ही पहाडी, कांग्रा, रजपूत व मोगल या इ. स. च्या चौदाव्या ते अठराव्या शतकापर्यंतच्या संप्रदायांची भारतीय चित्रकला पाहिली, तर त्यांतील मोगल शैली सोडून पहाडी, रजपूत, कांग्रा या तीन चित्रशैलीतील जवळपास दोन तृतीयांश चित्रे कृष्णाच्या चरित्राशी जोडली गेली आहेत. तेव्हा श्रीकृष्णचरित्र संगीताला, चित्राला, काव्याला, नाटकाला, नृत्याला अशा सगळ्या भारताच्या सांस्कृतिक जीवनाला आधारभूत राहिलेले आहे. या श्रीकृष्णचरित्राचे वैशिष्ट्य असे की, जीवन जेवढे गुंतागुंतीचे आहे तेवढे हे चरित्र गुंतागुंतीचे आहे व जीवन जेवढे विविध आहे, तेवढे हे चरित्र वैविध्याने नटलेले आहे. जीवनातले जे सगळे चांगले आहे, ते या कृष्णचरित्रात समाविष्ट झालेले आहे. म्हणून जीवनातल्या सामग्र्याचा प्रतिनिधी म्हणून 'पूर्ण परमात्मा' या नात्याने कृष्ण आपल्या संस्कृतीमध्ये आहे. म्हणून ही जी 'कृष्ण' नावाची पूर्ण परमात्म्याची मिथ आहे, ती आपल्या संस्कृतीचा, धर्माचा, परंपरेचा आधार बनली आहे. त्यात ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या सगळ्याच इतिहासामध्ये घडलेल्या आहेत, असे समजायचे कारण नाही.

आपल्या डोळ्यांसमोर जे कृष्णचरित्र आहे, तिथून आरंभ करीत क्रमाने

मागे जात जात इतिहासापर्यंत आपल्याला मागे जावे लागेल. कारण श्रीकृष्ण नावाचा जो माणूस इतिहासात केव्हातरी एकदा घडला, तो नेमका केव्हा घडला, हे जरी सांगता आले नाही, तरी श्रीकृष्ण घडला, ही घटना गौतम बुद्धाच्या जीवनाच्या काही शतके पूर्वीची आहे. या दोन बाबी आपण नीट लक्षात घ्या. पहिली गोष्ट श्रीकृष्णचरित्र हे केवळ काव्य नसून श्रीकृष्णचरित्राला इतिहासाचा आधार आहे. गौतम बुद्धाने आपल्या डोळ्यांसमोर दिसणारी जी राज्ये निवडली आहेत, त्यांपैकी बहुसंख्याक राज्ये कौरव-पांडवांच्या लढाईत जे लोक सामील झाले होते, त्यांच्या वंशजांची आहेत. ज्या वंशजांची राज्ये गौतम बुद्धाच्या काळापर्यंत शिल्लक आहेत, त्यांचे पूर्वज एका लढाईमध्ये गुंतलेले होते, ही गोष्ट नाकबूल करायला काही कारण नाही. म्हणून कौरव-पांडवांची लढाई ही एक इतिहासातील घटना आपण गृहीत धरली— आणि ती गृहीत धरणे भाग आहे— तर या लढाईच्या प्रमुख नेत्यांपैकी कृष्ण एक आहे.

तो इतिहासाचा भाग म्हणून आपल्याला मानणं भाग आहे. आणि कृष्णाचे वंशज पुढे चालून दीर्घकाळ आपल्याला दिसताहेत. त्यांची राज्ये आहेत, त्या वंशजांचे वेगवेगळे फाटे आहेत. यादवांचे शेवटचे राज्य अल्लाउद्दीन खिलजीने बुडविलेले आहे. तेव्हा इथपर्यंत यादव वंशाच्या परंपरा पसरलेल्या असल्यामुळे कृष्णाचे चरित्र बुद्धाच्या पूर्वी केव्हा तरी घडलेले आहे. इतिहासात जो कृष्ण नावाचा माणूस घडून गेला आहे, त्याचा काळ इ. स. पूर्व १००० पेक्षा जुना आहे. किती मागे हा वादाचा प्रश्न आहे, परंतु आपल्या डोळ्यांसमोर जे कृष्णचरित्र आहे, ते इ.स. पूर्व १००० ला जे घडले ते चरित्र नाही, तर इ. स. पूर्व १००० ला जे चरित्र घडले त्यावर वेगवेगळ्या कारणाने, वेगवेगळी पुटे चढत चढत आपल्या संस्कृतीने जे चरित्र स्वीकारले, ते चरित्र आपल्या डोळ्यांसमोर आहे. या चरित्राचे वैशिष्ट्य असे की, केवळ भारतीय वाङमयात नव्हे तर जगाच्या वाङमयात प्रेम नावाची जी संकल्पना— त्या संकल्पनेच्या प्रतिकांतील सर्वश्रेष्ठ प्रतीकाचा आधार हे श्रीकृष्णचरित्र आहे. केवळ आपण भारतीय आहोत, आणि मी भारतीय आहे या अभिमानाने नव्हे, तर मी एका ऐतिहासिक विश्लेषणाच्या पद्धतीने सांगतो आहे. राष्ट्राभिमान वगैरे बाबी इतिहास संशोधनामध्ये आणण्याची माझी पद्धत नाही.

श्रीकृष्णाच्या ज्या वेगवेगळ्या बायका आहेत, त्यांपैकी श्रीकृष्णाशी सदैव भांडणारी, अत्यंत भांडकुदळ अशी त्याची बायको आहे सत्यभामा ! या सत्यभामेच्या कहाण्या सर्वत्र प्रसिद्ध आहेत, नाटकाचा विषय सुद्धा झालेल्या आहेत. सत्यभामेचे लग्न कृष्णाबरोबर झालेले आहे. नवरा म्हणून सत्यभामेला श्रीकृष्ण आवडत नाही, असा त्याचा अर्थ आहे का ? मी इतकी सुंदर आहे, देखणी आहे, माझ्या पदरी हे काय भूत पडले आहे, आपोआप पडले आहे तर वागवून नेणे भाग आहे, असे काही सत्यभामेचे म्हणणे नाही. सत्यभामेचे श्रीकृष्णावर प्रेम आहे आणि श्रीकृष्णावर प्रेम करण्याचा जिथपर्यंत प्रश्न आहे तिथपर्यंत सत्यभामा श्रीकृष्णाशी पूर्णपणे एकनिष्ठ आहे. सत्यभामेच्या जीवनात दुसरा पुरुष नाही. श्रीकृष्णाचे काही बरेवाईट झाले, तर मला एखादा चांगला पुरुष पाहिजे, असे काही सत्यभामेने कोठे म्हटलेले नाही. सत्यभामा ही श्रीकृष्णाची पत्नी आहे, तिचे कृष्णावर प्रेम आहे. भांडणाचा मुद्दा हा आहे की, माझ्याखेरीज दुसऱ्या कोणावर श्रीकृष्णाने प्रेम का करावे ? हा नवरा मला मान्य आहे, त्याच्याबरोबर संसार करायला मी तयार आहे, या नवऱ्याबरोबर संसार करताना सुखदुःखे भोगायची माझी तयारी आहे, कष्ट करायला मी तयार आहे, मी या नवऱ्याशी एकनिष्ठ राहायला तयार आहे; मात्र माझा नवरा व मी यांच्यांत कोणी दुसरी वाटेकरीण मानायला मी तयार नाही, ही सत्यभामेची भूमिका आहे. सगळ्या बायकांची हीच पद्धत आहे. हा नवरा मला आवडतो, त्याच्यावर माझे प्रेम आहे, मी त्याच्याशी एकनिष्ठ राहीन, त्याच्याबरोबर भीक मागीन, उपाशी राहीन, खस्ता खायला मी तयार आहे, कष्ट करायला तयार आहे, त्याच्या सुखदुःखांत सामील व्हायला तयार आहे, परंतु आमच्या दोघांच्या संसारात तिसरी वाटेकरीण मानायला मी तयार नाही ! सत्यभामेचे सगळे भांडण या मुद्द्यावर आहे. जगातील कोणतीही संसार करणारी स्त्री ही सामान्यपणे सत्यभामेचीच आवृत्ती असते. स्त्रिया सत्यभामेची कहाणी वाचीत असताना 'मी नाही तशी' असे म्हणतात; पण विश्लेषण केल्यावर हे लक्षात येईल की, संसार करणारी स्त्री ही सत्यभामेचीच आवृत्ती असते आणि सत्यभामेची आवृत्ती असणे सर्वसामान्य स्त्रीचे लक्षण आहे. सत्यभामा श्रीकृष्णाची पत्नी आहे, त्याची प्रेयसी आहे आणि ती प्रेमाचे असे एक महत्त्वाचे उदाहरण आहे.



अलीकडे सत्यभामा मिळणे अतिशय कठीण आहे. जीवनाचा विकास असा होतो आहे की, सत्यभामा दुर्मिळ होत आहे. याचा अर्थ काय की, हा माझा नवरा आहे, तो मला आवडतो, त्याच्यावर माझे प्रेम आहे, त्याच्याबरोबर सुख-दुःख, दैन्य-दारिद्र्य भोगायला मी तयार आहे, त्याच्याविषयी काही तक्रार नाही, हा नवरा सोडायचाही विचार नाही, दुसऱ्या पुरुषाचाही विचार नाही, परंतु त्याच्या-माझ्या प्रेमात दुसरी वाटेकरीण मानायला मी तयार नाही, या मुद्द्यावर आग्रही असणारी प्रामाणिक संसार करणारी स्त्री ही दुर्मिळ होते आहे. ती दुर्मिळ होते आहे हे चांगले की वाईट, हा वेगळा मुद्दा आहे, पण ती दुर्मिळ होते आहे हे खरे आहे. प्रेमाच्या कल्पनेचे सत्यभामा हे महत्त्वाचे पण तिसऱ्या दर्जाचे रूप मानले जाते.

या सत्यभामेपेक्षा प्रेमाचे अधिक वरचे रूप म्हणजे रुक्मिणी होय ! सत्यभामा आणि रुक्मिणी यांमध्ये दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर फरक आहे. पहिली गोष्ट म्हणजे सत्यभामेने श्रीकृष्ण निवडलेला नाही. सत्यभामेच्या बापाने सत्यभामेचा हात

श्रीकृष्णाच्या हातात दिलेला आहे. आमचे बाबा ज्याच्याशी लग्न लावून देतील, त्याच्याशी आम्ही निष्ठेने संसार करू, ही अगदी परंपरेची पद्धत आहे. चांगली आहे, असे मी म्हणणार नाही; पण वाईटच आहे, याची मी खात्रीही देणार नाही. कारण वयाच्या विसाव्या-बाविसाव्या वर्षी तारुण्याच्या ऐन भरात जीवन ज्याच्या-बरोबर जगायचे, त्याचे मोजमाप करायची शुद्ध असतेच अशी खात्री देणे कठीण आहे ! आपण असे समजू नका की, मी सनातन धर्माचा पुरस्कार करतो आहे. मी स्वतः प्रेमविवाह केलेला माणूस आहे, पण तो प्रेमविवाह करणे निराळे व या वयात विसाव्या-पंचविसाव्या वर्षात– सबंध जीवनाचा पोच आला असणे निराळे ! तो पोच निराळा आहे. आम्ही आमचा नवरा निवडण्याच्या भानगडीत पडणार नाही, आमचे बाबा ज्यांच्या हातात हात देतील त्याच्याशी आम्ही निष्ठेने संसार करू, ही सत्यभामेची भूमिका आहे !

रुक्मिणीची भूमिका निराळी आहे. रुक्मिणीचे बाबा ज्याच्या हातात हात द्यायला तयार होते, त्याच्याशी संसार करायला रुक्मिणीची तयारी नव्हती. रुक्मिणी ही विसाव्या शतकातल्या सुशिक्षित मुलींना थोडीशी जवळची वाटण्याचा संभव आहे. रुक्मिणीने पत्र लिहून श्रीकृष्णाला कळवले की, "माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू येऊन मला घेऊन जा. भावाची इच्छा मी शिशुपालाशी लग्न करावे, ही आहे; आणि वडिलांची इच्छा भावाला दुखविण्याची नसल्याने भाऊ जे करील ते त्यांना मान्य आहे. पण माझी काही ती इच्छा नाही. तू ये अन् मला पळवून घेऊन जा."

आज जर एखाद्या मुलीने आपल्या प्रियकराला पत्र लिहिले की, "तू ये अन् मला घेऊन जा !" तर मी असे मानायला तयार आहे की, ती रुक्मिणीच्या परंपरेचे प्रामाणिकपणे अनुसरण करते आहे. म्हणून सत्यभामा आणि रुक्मिणी यांच्यांत पहिला महत्त्वाचा फरक हा आहे की, सत्यभामेच्या दैवात श्रीकृष्ण लिहिला आहे आणि जे दैवाने तिला मिळाले, त्याच्याशी ती एकनिष्ठ आहे. रुक्मिणीने कृष्ण हा प्रियकर म्हणून निवडलेला आहे, म्हणून रुक्मिणीचा कृष्णावर जास्त हक्क आहे. रुक्मिणीचा हक्क जास्त आहे, कारण जे पदरात पडले, ते रुक्मिणीने स्वीकारले नाही, तर जे आवडले ते पदरात पाडून घेण्याचा रुक्मिणीने प्रयत्न केलेला आहे ! या ठिकाणी रुक्मिणी ही सत्यभामेपेक्षा निराळी आहे. माझे कृष्णावर प्रेम आहे, मी त्याची पत्नी आहे, मी कृष्णाबरोबर सुखाचा संसार करते आहे, यात रुक्मिणी तृप्त आहे. याखेरीज या प्रेमात वाटेकरी किती आहेत, याविषयी रुक्मिणची तक्रार नाही ! ही दुर्मिळ स्त्री आहे. हा माझा प्रियकर आहे, तो मी मिळवला, त्याच्याशी माझे लग्न झाले, त्याच्याबरोबर माझा सुखाने संसार चालू आहे, तो आजही येतो, आम्ही एकत्र बसून जेवतो, तो आजारी पडला की माझ्याकडेच येतो, मी आजारी पडले की काळजी घेतो, खर्चाला कमी करीत नाही. आमचे



उत्तम जुळते. घराबाहेर गेल्यावर तो काय करतो याच्याशी मला काही कर्तव्य नाही. हा तो मुद्दा आहे. ही स्त्री असंभाव्य नाही, पण दुर्मिळ आहे. मी आपल्याला सांगितले की, सत्यभामा दुर्मिळ होत असल्याने रुक्मिणी अतिशयच दुर्मिळ होत चालली आहे.

रुक्मिणी हे आमच्या प्रेमकल्पनेचे सर्वोच्च रूप नाही. आमच्या प्रेमाचे सर्वोच्च रूप आहे राधा ! सत्यभामेचा वरचा टप्पा आहे रुक्मिणी व रुक्मिणीच्याही वरचा टप्पा राधेचा आहे. म्हणून, 'हे प्रियकरा ! तू माझ्याशी लग्न कर ही अपेक्षा नाही, तसेच तू माझ्याशी लग्न करणार नसशील तर नको करूस, पण दुसऱ्या कुणाशीही लग्न करू नकोस हीही अपेक्षा नाही.' हा फार महत्त्वाचा फरक आहे. 'तू माझ्याशी लग्न कर,' ही अपेक्षा सोडणे सोपे आहे. राधेचा मुद्दा हा की, 'हे माझ्या प्रियकरा ! तू माझ्याशी लग्न करावेस ही माझी अपेक्षा नाही. तसेच तू दुसऱ्या कुणाशी लग्न करू नयेस, हीही अपेक्षा नाही.' म्हणून श्रीकृष्णाच्या जीवनात सोळा हजार एकशे आठ बायका आल्यात याला राधेचा आक्षेप नाही, तसेच श्रीकृष्णाने आपल्याशी लग्न केले नाही यालाही राधेचा आक्षेप नाही. विवाहामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिष्ठेची, संरक्षणाची अपेक्षा नाही, विवाहाचीच अपेक्षा नाही ! राधा याही पुढे गेलेली आहे. विवाहाची तर अपेक्षाच नाही, पण कृष्णाचा आपल्याला सतत सहवास मिळावा, हीही अपेक्षा नाही. कृष्ण एकदा गोकुळ सोडून मथुरेला गेल्यावर तो मथुरेतून गोकुळात म्हातारपणी चार-आठ दिवसांसाठी जातो आणि पुन्हा कधीही जात नाही ! पुढचे श्रीकृष्णाचे जे साठ-पासष्ट वर्षांचे आयुष्य आहे, त्या साठ-पासष्ट वर्षांच्या आयुष्यात राधा आणि कृष्ण यांचा सहवास नाही ! ज्या क्षणी राधा हे म्हणते की, "हे माझ्या प्रियकरा, तू माझ्याशी विवाह करावास, ही अपेक्षा नाही, नित्य सहवास लाभावा हीही अपेक्षा नाही," त्या क्षणी हे प्रेम वासनेच्या पलीकडे निघून जाते ! कारण सहवासाची, संरक्षणाची, प्रतिष्ठेची अपेक्षा नाही. त्या प्रीतीत वासना वर्ज्यही नाही आणि वासना त्या प्रीतीचा आधारही नाही ! ती वासनेच्या पलीकडे निघून गेलेली आहे. ही जी निरपेक्ष प्रीतीची कल्पना राधेच्या रूपाने आमच्या संस्कृतीने उभी केली आहे ती जगातल्या वाङ्मयातल्या 'प्रेम' या कल्पनेचे सर्वांत मधुर व उदात्त असे स्वरूप आहे. ख्रिश्चन, इस्लाम वा इतर कोणत्याही संस्कृतीने यापेक्षा निर्दोष प्रेमकल्पना आणि तिचे प्रतीक उभे केलेले मला आढळलेले नाही !

कृष्णाचे चरित्र हे आमचे तत्त्वज्ञान, संस्कृती, कला यांचा आधार आहेच; पण जीवनमूल्यांपैकी सर्वांत उच्च मूल्य जे प्रेम त्यालाही कृष्णाचे चरित्र आधार आहे. इथपर्यंत ठीक आहे, पण यांपैकी कशाचाही इतिहासाशी संबंध नाही ! राधेच्या आधारे श्रीकृष्णचरित्राच्या निमित्ताने सर्वांत मोठा काव्याचा प्रवाह निर्माण झाला

आहे, असे आपण म्हणतो. कृष्णचरित्रातील संगीताला आधार राधेमुळे, चित्राला, प्रेमकल्पनेचा आधार राधेमुळे आहे, तसेच तत्त्वज्ञानालाही अर्धा आधार राधेमुळे आहे !

जे वेदांताचे प्रसिद्ध भाष्यकार आहेत, त्यांत शंकराचार्य, रामानुज, मध्वाचार्य सोडून दिले, तर वल्लभाचार्यांच्या पंथात राधा आहे, निम्बार्कांच्या पंथात राधा आहे, आणि निम्बार्कांच्या पंथाचा जो पोटभाग म्हणजे चैतन्य महाप्रभूंचा जो अचिंत्य भेदाभेदाचा पंथ आहे, त्यातही राधा आहे. कृष्णाच्या तत्त्वज्ञानाचा अर्धा आधार राधा आहे. ही राधा इ. स. च्या नवव्या शतकापूर्वी नाही ! इ. स. च्या नवव्या शतकाच्या मागे तुम्ही गेलात, तर कृष्णाच्या चरित्रात राधा नाही ! तर मग राधा-दामोदर, राधा-गोविंद, राधा-माधव, राधा-कृष्ण यांच्या प्रेमकहाण्या, या प्रेमकहाण्यांवर आधारित काव्य, चित्र, नाटक, नृत्य इत्यादी, इत्यादी...सर्व नवव्या शतकानंतर आढळते. तेव्हा या सगळ्या कवितेला आमच्या ऐतिहासिक विश्लेषणात जागा नाही. म्हणून जर फ्रॉम मिथ टु हिस्टरी– पुराणकथेकडून इतिहासाकडे जायचे असेल, तर प्रथम तुम्हाला राधा सोडून द्यावी लागते ! नवव्या शतकाच्या पूर्वी राधा नाही.

राधेचे सर्वांत मोठे प्रस्थ असेल, तर चैतन्यप्रभूंच्या अचिंत्य भेदाभेदामध्ये आहे. हे आहे इ. स. चे १५ वे शतक ! त्याआधी राधेचे प्रकरण वल्लभाचार्यांच्या पंथात आहे. वल्लभाचार्यांच्या पंथातच सूरदास, मीराबाई आढळतात. वल्लभाचार्यांचा काळ आहे इ. स.च्या तेराव्या शतकाचा शेवट आणि चौदाव्या शतकाची सुरवात ! त्यापूर्वी राधा दिसत असेल तर निम्बार्कांमध्ये आढळले इ. स. च्या अकराव्या शतकात ! पुराणात राधेचे अत्यंत तपशीलवार वर्णन आलेले आहे ब्रह्मवैवर्त पुराणात ! हे पुराण बंगालच्या परिसरात निर्माण झालेले आहे. त्याच्यापूर्वीचे फुटकळ उल्लेख इ. स. १००० पासून आढळतात. मी एक शतक मागे गेलेलो आहे. इ. स. नऊशे नंतर राधा आणि राधाकल्पनेचा विकास आढळतो. यांच्यामागे राधा नाही, म्हणून मागच्या कृष्णचरित्रात जायचे असेल, तर राधा सोडून द्यायला पाहिजे !

राधा सोडून दिली, तरी सत्यभामा आहेच ! राधा सोडून दिली, तरी रुक्मिणी आहेच ! रुक्मिणी ही सर्व पुराणकथांमधून चालत आलेली आहे. अर्थात् पुराणकथांमधून चालत आलेली रुक्मिणी ही तुमच्या-आमच्या परिचयाची नाही. रुक्मिणीचे श्रीकृष्णाबरोबर लग्न झालेले आहे. त्याचे अतिशय काव्यमय वर्णन भागवतात पाहायला सापडते. तसेच भागवतावर आधारलेल्या नानाविध काव्यांमध्ये ! मराठीमध्ये 'रुक्मिणीस्वयंवर' काव्यं काही थोडी नाहीत, जवळपास सव्वतीसच्यावर रुक्मिणी-स्वयंवरे आहेत.



नरेंद्राच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'पासून पुढे सगळी रुक्मिणीस्वयंवरे आपल्याकडे आहेत. या सगळ्या स्वयंवरकथांचा आधार भागवत ! या भागवतामध्ये उल्लेख आहे की, रुक्मिणीचे कृष्णावर प्रेम होते, पण रुक्मीची इच्छा रुक्मिणीचे लग्न शिशुपालाशी करावे, ही होती. म्हणून रुक्मिणीने सुदेव ब्राह्मणाबरोबर श्रीकृष्णाला निरोप पाठवला की, "माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू मला घेऊन जा." मग श्रीकृष्ण आला आणि रुक्मिणीला घेऊन गेला !

भागवतामध्ये या विवाहाचे वर्णन करताना शब्द मात्र राक्षसविवाह असा लावलेला आहे ! 'राक्षसेण हरयेत् कन्याम् ।' श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केले, तो राक्षसविवाहाचा भाग आहे. ही नोंद भागवतामध्ये केलेली आहे. खरे तर रुक्मिणीचे प्रेम श्रीकृष्णावर असेल व तिने जर निरोप पाठवला असेल की, 'हे परमेश्वरा ! तू मला येऊन घेऊन जा,' तर मग रुक्मिणीचा विवाह हा गांधर्वविवाहाचा भाग असायला पाहिजे, पण भागवतामध्ये त्याचे वर्णन राक्षसविवाह म्हणूनच आलेले आहे ! याचे कारण म्हणजे रुक्मिणीच्या विवाहाची मूळची कहाणी ही राक्षसविवाहाचीच आहे, गांधर्वविवाहाची नाही. म्हणून रुक्मिणीच्या विवाहाची जी कथा भागवतामध्ये आढळते, तो उत्तरकालीन विस्तार आहे. ती भागवतापेक्षा अधिक मूळच्या स्वरूपात हरिवंशात सापडते व हरिवंशापेक्षाही मूळच्या स्वरूपात इतिहासाच्या जास्तीत जास्त जवळ जाणारी कथा विष्णुपुराणात सापडते. विष्णुपुराणात सापडणारी कथा ही राक्षसविवाहाचीच आहे. ती कथा अशी आहे–

विदर्भ देशाचा राजा भीमक हा जरासंधाचा चाहता ! आपण सर्व देवदेविकांच्या कहाण्या वाचत असताना ज्या काळात या कहाण्या घडल्या आहेत, त्या काळचे राजकारणाचे संदर्भ विसरून गेलेलो आहोत. विदर्भ देशाचा राजा भीमक हा जरासंधाचा चाहता होता, म्हणून जरासंधाचा दुसरा चाहता चेदी देशाचा राजा शिशुपाल याला आपली मुलगी देणे भीमकाला आवश्यक वाटले. चेदी आणि विदर्भ यांचे सोयरसंबंध आले की, जरासंधाची जी सबंध फळी आहे ती सोयरसंबंधाने बळकट होईल, असे भीमकाचे म्हणणे आहे. तेच रुक्मीला मान्य आहे, म्हणून रुक्मीणीचा विवाह चेदी देशाचा राजा शिशुपाल याच्या बरोबर करण्याचा निर्णय भीमकाने घेतला. रुक्मीने तो मान्य केला, शिशुपालाने तो मान्य केला. रुक्मिणीने त्याला विरोध केल्याची नोंद विष्णुपुराणात कुठेही नाही. शिशुपालाचे लग्न ठरले. तेव्हा या लग्नाला शिशुपालाचा नातेवाईक म्हणून नवऱ्याच्या बाजूने बिऱ्हाडकरू म्हणून श्रीकृष्ण हजर आहे ! नवरदेवाच्या बिऱ्हाडात यादवही आले आहेत. भीमक देशाच्या प्रथेप्रमाणे गावाच्या बाहेर इंद्रायणीचे एक देवालय आहे. नवरीच्या फौजा नवरीला या इंद्रायणीच्या देवालयात नेऊन सोडतात. नवरदेवाच्या फौजेने तिचे रक्षण करायचे. होम हवन, इंद्रायणीची पूजा झाल्यावर मग इंद्रायणीच्या

देवालयातून नवरीला सुरक्षितपणे मांडवापर्यंत आणण्याचे काम नवरदेवाच्या फौजेने करायचे–मग लग्न, अशी प्रथा होती.

शिशुपालाने विचार केला की, श्रीकृष्ण आलेलाच आहे, तर इंद्रायणी देवालयाचे संरक्षण, नवरीचे रक्षण, व तिला तिथून मांडवापर्यंत आणण्याचे काम श्रीकृष्णावर सोपवावे ! म्हणून श्रीकृष्ण शिशुपालाच्या आज्ञेने नवरीच्या संरक्षणार्थ यादवांच्या फौजा घेऊन इंद्रायणीच्या देवालयात जाऊन उभा राहिला. भूमिका आहे नवरीचे रक्षण करण्याची ! इंद्रायणीची पूजा, होम-हवन आटोपले, नवरी बाहेर आली तोवर श्रीकृष्णाची भूमिका ही तिचे रक्षण करण्याचीच आहे. पण नवरी जेव्हा त्याने पाहिली, तेव्हा त्याला ती इतकी आवडली की, तो म्हणाला, 'आता हिच्यावरून आपले मन ढळणे कठीण आहे !' म्हणून त्याने तिला उचलले, आपल्या रथात घातले, अन् पळवून न्यायला सुरवात केली ! ही घटना घडल्याबरोबर शिशुपालाच्या फौजेने त्याचा पाठलाग केला. श्रीकृष्णाने त्याच्या फौजेचा पराभव केला, नवरी रथात घातली अन् तिला घेऊन तो पळाला. हा पळून आपल्या राजधानीत म्हणजे द्‌वारकेत आला, त्यानंतर राजकन्येशी त्याने लग्न केले.

माझा अंदाज असा आहे की, श्रीकृष्णाने केवळ राजकन्याच पळविली असे नव्हे, तर भीमकाची राजधानीसुद्धा या निमित्ताने त्याने लुटली. कारण एकदा श्रीकृष्णाचा रुक्मिणीशी विवाह झाल्यानंतर रुक्मिणीचा भाऊ पुन्हा त्या राजधानीत गेला नाही ! त्याने शेवटी नवीन राजधानी बांधली. तिथे तो राहिला. माझे अनुमान एका मुद्द्यावर आधारलेले आहे की, सर्वसामान्यपणे राजकन्येचे नाव हे तिच्या बापावरून आणि तिच्या देशावरून ठेवले जाते. द्रुपदाची मुलगी म्हणून द्रौपदी, पांचाल देशाची राजकन्या म्हणून पांचाली, जनकाची मुलगी म्हणून जानकी, विदेह देशाची राजकन्या म्हणून वैदेही ! असे सगळे आपण पाहायला लागलात की नावे सापडतात. रुक्मिणीचे नाव तिच्या बापावरूनही ठेवलेले नाही आणि तिच्या देशावरूनही ठेवलेले नाही. नाव ठेवले आहे सोन्यासहित आणलेली असे ! रुक्म म्हणजे सोने ! सोन्यासहित आणलेली म्हटले एकीकडे आणि दुसरीकडे तिच्या भावाने राजधानीचे नवीन गाव वसवले, याचा सांधा जुळला की श्रीकृष्णाने भीमकाची राजधानी लुटलेली आहे, ही गोष्ट उघड होते ! श्रीकृष्णाने भीमकाचे राज्य लुटणे, शिशुपालाचा पराभव करणे, रुक्मिणीला पळवून आणणे हे सुसंगत आहे, कारण जरासंध आणि यादव यांचे पुरातन काळापासून वैर चालत आलेले आहे. जरासंधाचा पराभव करणे, हे श्रीकृष्णाला त्याच्या राजकारणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून रुक्मिणीच्या विवाहाची कथा ही प्रेमकथा नसून, गांधर्वविवाहाची कहाणी नसून राक्षसविवाहाची कहाणी आहे. या राक्षसविवाहाच्या कहाणीचे इ. स. च्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकानंतर क्रमाने प्रेमकथेत रूपांतर होते व इ. स. च्या सहाव्या-सातव्या शतकानतर ती पूर्ण प्रेमकहाणी होते ! भागवतात ती प्रेमकहाणी दिसते, त्याच्याआधी ती राक्षसविवाहाची कहाणी आहे.



श्रीकृष्णाच्या जीवनात इतिहासाच्या दृष्टीने पाहायला लागले तर रुक्मिणीला कवडीइतकी किंमत नाही ! म्हणून महाभारतात आपण गेलो, तर श्रीकृष्णाबरोबर सदैव सत्यभामा आहे. श्रीकृष्णाबरोबर रुक्मिणी कोठेही नाही ! महाभारतात रुक्मिणी आहे कृष्णाची बायको म्हणून ! पण कृष्णाबरोबर सदैव त्याची पट्टराणी म्हणून सत्यभामा आहे. आणि ऐतिहासिक दृष्टीने श्रीकृष्णाची पट्टराणी सत्यभामाच असणार, कारण श्रीकृष्णाच्या आठ बायकांपैकी यादव कुळातील फक्त सत्यभामाच आहे. बाकीच्या बाहेरून पकडून, पळवून, जिंकून आणलेल्या आहेत–कधी पण जिंकून तर कधी राक्षसविवाहाने ! त्या बायका आहेत, त्या आरामात राहतील, वैभवशाली जीवन त्यांना मिळेल, पण पट्टराणीपदाचा मान त्यांना मिळणार नाही; कारण त्यासाठी कृष्णाला त्याच्या कुळातीलच बायको लागेल ! महाभारतात श्रीकृष्णाबरोबर सर्वत्र असणारी त्याची पत्नी सत्यभामाच आहे, म्हणून जसे जसे आपण पुराणकथेकडून इतिहासाकडे जातो, तेव्हा पहिल्यांदा राधा जाते, नंतर रुक्मिणी जाते, शिल्लक राहते सत्यभामाच !

आपल्याला श्रीकृष्णाचा इतिहास काळजीपूर्वक पाहण्याची आवश्यकता आहे. आणि श्रीकृष्णाचा इतिहास काळजीपूर्वक पाहायचा असेल, तर काव्य बाजूला सारून तो पहावा लागेल, कारण काव्याच्या दृष्टीने पाहायला लागलात की मग होरी, कजरी, 'श्रीरंगा, कमलकांता, हरी पदराते सोड,' इथपासून तो सुरू होतो. 'तू पदर का धरला', याच्यावर भांडण नाही, 'आता तरी पदर सोड' एवढाच मुद्दा आहे ! नवव्या शतकानंतर त्याच्याआधी तुम्ही यायला लागलात की क्रमाने एका एका स्वप्नाचा रंग गळून जातो आणि आपण राजकीय इतिहासाकडे वळायला लागतो. राजकीय इतिहासाच्या दृष्टीने पाहायचे असेल, तर यादवांचे राज्य हे मूलतः गणतंत्र आहे, हे आपण लक्षात घ्या. यादवांचे राज्य ही राजेशाही नाही, हे आपल्या लक्षात येईल. यादवांचा राजा कोण ? याचे चटकन् उत्तर येईल की, यादवांचा राजा श्रीकृष्ण आहे. श्रीकृष्णाला राजा होण्याचा अधिकार नाही, त्याचा वडील भाऊ बलराम जिवंत आहे. बलराम जिवंत असताना श्रीकृष्णाला राजा होता येत नाही. यादवांचा राजा व्हायचे असेल, तर बलरामाला व्हावे लागेल आणि बलरामाला राजा होता येत नाही, कारण त्याचा बाप जिवंत आहे वसुदेव ! म्हणून राजा व्हायचेच असेल, तर वसुदेवाला व्हावे लागते. मूळ कहाणीत असे म्हटले आहे की, कंसाला मारल्यानंतर कृष्णाने उग्रसेनांचे राज्य उग्रसेनाला परत केले. म्हणून राजा कोण आहे तर तो उग्रसेन आहे आणि उग्रसेन कोण आहे याचा पत्ता नाही ! उग्रसेन म्हातारा

झाला तरी मरेना, म्हणून कंसाने त्याला तुरुंगात टाकले. नंतर कंस राजा झाला. नंतर देवकीला आठ मुले झाली, त्यांतला आठवा कृष्ण. तो मोठा झाला. मग त्याने कंसाला मारले. उग्रसेनाचे राज्य उग्रसेनाला परत केले. नंतर कृष्ण तरुण झाला. मग त्याची लग्ने झाली. मग त्याला दहा मुले झाली. ती मोठी झाली. त्यांना मुले झाली—या मुलांना मुले झाली, श्रीकृष्णाच्या म्हातारपणी सगळे यादव आपापसांत लढून मेले ! मग राहिल्या कृष्णाच्या बायका ! त्या कृष्णाच्या बायका वसुदेवाने अर्जुनाच्या हवाली केल्या. मग वसुदेवाने देहत्याग केला व त्यानंतर यादवांच्या बायका अर्जुनाच्या हाती सुरक्षित आहेत, याची खात्री पटल्यावर मग उग्रसेन मेला. उग्रसेनाचे आयुष्य पहा किती आहे ते !

उग्रसेन हे माणसाचे नाव नाही. ते राज्यपद्धतीचे नाव आहे. यादवांची राजवट ही गणतंत्र आहे, याचा सर्वत्र उल्लेख आहे. प्राचीन भारतातल्या गणतंत्राचा जो पहिला अतिशय चांगला अभ्यास केला, तो १९२४–२५ च्या सुमारास काशीप्रसाद जयस्वाल यांनी ' इंडियन पॉलिटी ' या नावाने ! त्यात यादवांची राजवट गणतंत्र असल्याचे सर्व जुने-नवे मुद्दे क्रमाने दिलेले आहेत. यादवांचे गणतंत्र आहे, त्यांची गणसभा आहे. प्राचीन भारतात ज्या जुन्या लोकशाह्या आहेत, त्या जुन्या लोकशाह्यांपैकी जी जुनी गणराज्ये आहेत त्यांपैकी यादवांचे एक आहे. यादवांचे एकट्यांचेच नाही तर लिच्छवींचे आहे, यौधेयांचे आहे, मद्रकांचे आहे, अर्जुनीयकांचे आहे, अशी नानाविध गणतंत्रे प्राचीन भारतात आहेत. ही गणतंत्रे संपत संपत आलीत— शेवटची गणतंत्रे चंद्रगुप्त, विक्रमादित्य यांनी संपवलेली आहेत. चंद्रगुप्त आणि विक्रमादित्य यानी यौधेयांचे गणतंत्र संपवून भारतीय गणतंत्राची समाप्ती केली ! या गणतंत्रांची नोंद इ. स. १००० पासून इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीपर्यंत दाखवता येईल. हा जो गणतंत्रांचा लांब-रुंद इतिहास आहे, त्याचा तपशीलवार अभ्यास काशीप्रसाद जयस्वाल यांनी केला, नंतर अनेकांनी केला— दांडेकरांनी केला— आळतेकरांनी केला, पुष्कळांनी केला.

हे यादवांचे गणतंत्र आहे ते कलोपजीवी, पशुप्रधान गणतंत्र आहे, हे मुद्दे आपण नीट लक्षात घ्या. पशुप्रधान याचा अर्थ असा की, गोधन हे त्यांचे मुख्य धन ! त्यामुळे गाईंची विक्री, बैलांची विक्री, दुधाची विक्री हा मुख्य उद्योग ! शेती अनुषंगाने ! हे जे पशुप्रधान, गोपालनप्रधान अशा प्रकारचे यादवांचे गणतंत्र आहे, त्याच्यात शूर, भोज, अंधक असे छोटे छोटे गट आहेत. या गटांचे मिळून हे गणतंत्र आहे. हे जे गणतंत्र श्रीकृष्णाच्या पूर्वजांच्या काळापासून चालत आलेले आहे, त्याचा एक नेता कंस आहे. शेजारी जरासंधाचे राज्य मगधामध्ये आहे ! तो आजूबाजूचे राजे मांडलिक करतो, आजूबाजूची गणतंत्रे बुडवतो, गणतंत्र बुडवण्याला साह्य करतो, कारण त्याला साम्राज्यनिर्मिती करायची आहे. या जरासंधाच्या मुली कंसास दिल्या आहेत. या कंसाने यादवांचे गणतंत्र बुडवून स्वतःची राजेशाही निर्माण केली. जोपर्यंत यादवांचे गणतंत्र चालू होते, तोवर गणसभा होत्या, त्यांचे मंत्रिमंडळ होते आणि या मंत्रिमंडळातील एक मंत्री आहे वसुदेव— श्रीकृष्णाचा बाप ! त्या गणतंत्राचा तो मंत्री असल्याने, ते बुडाल्यावर त्याचे मंत्रिमंडळ गेलेले आहे, त्यामुळे ते मंत्रिमंडळ पुन्हा स्थापन व्हावे, यासाठी धडपडणाऱ्या मंडळींपैकी तो एक आहे. या वसुदेवाच्या दहा-अकरा बायका आहेत, संतती भरपूर आहे. वसुदेवाच्या सगळ्या बायकांची नावे हरिवंशात आलेली आहेत. त्यांतल्या काही बायका मथुरेत आहेत, काही त्याच्याशेजारी गोकुळात यमुनेच्या पलीकडे आहेत. हा स्थानबद्धतेत आहे, कैदेत नाही. स्थानबद्धतेत असल्याने मथुरा सोडून जायचे नाही, हा आदेश गुंडाळून अधूनमधून तो गोकुळात जातो, म्हणून बलरामाचा जन्म झालेला आहे, नाही तर बलरामाचा जन्म व्हायचे कारण नाही !



यादवांच्या राज्यात गणतंत्र पुन्हा स्थापन करून राजेशाही बुडवावी कशी, ह्याचा विचार चालू आहे. राजेशाही बुडवून गणतंत्र स्थापण्याचा प्रयत्न केला, तर जरासंधाच्या फौजा तातडीने मथुरेवर चाल करून येतील, त्याचे उत्तर कसे द्यावे, ह्याचाही विचार चालू आहे. हा विचार चालू असताना जुन्या गणतंत्राच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री वसुदेव, त्याच्या अनेक बायकांपैकी एक बायको देवकी हिच्या पोटी श्रीकृष्ण नावाचा मुलगा जन्माला आलेला आहे. उरलेले सर्व काव्य ! आठवे मूल होते, नववे मूल होते, आकाशवाणी झाली, ही अशी मुले मारली, तशी मुले मारली, याचा तुरुंगात जन्म झाला, त्याच्या पायाचा स्पर्श झाल्यावर बेड्या तुटून पडल्या, हे काव्य ! काव्य चांगले आहे. त्याचा काव्य म्हणून आस्वाद घ्यायला काहीच हरकत नाही. काव्याचा आस्वाद घेत जावा माणसाने. आपला सुसंस्कृतपणा जतन करण्यासाठी ते उपयोगी पडते. पण ते काव्य आहे, इतिहास नाही, हे लक्षात घ्यावे.

श्रीकृष्ण जेव्हा तरुण झाला— सोळा-सतरा वर्षांचा झाला, तेव्हा गणतंत्र पुनरपि स्थापन करावे, असे म्हणणाऱ्या गटाचा तो नेता झाला. मूळ महाभारतात श्रीकृष्णाने युधिष्ठिराला समजावून सांगितले की राजसूय यज्ञ करणे कसे आवश्यक आहे, पण जरासंध मेल्याशिवाय राजसूय यज्ञ करणे शक्य नाही. तेव्हा युधिष्ठिराने श्रीकृष्णाला विचारले की, " या जरासंधाची तुला काय माहिती आहे ?" तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला, " मला जितकी माहिती आहे, तितकी कोणालाच असणार नाही. अरे, या जरासंधाचा जावई कंस, याचे राज्य चालू ठेवणे आम्हांला परवडणारे नव्हते आणि त्याचे राज्य बुडवून टाकले, तर त्याच्या अनेक फौजा आमच्यावर चाल करून येतील, त्यांच्याशी तोंड द्यायची आमची ताकद नव्हती ! या चिंतेत

अनेक वर्षे गेली. शेवटी मथुरेच्या आत असणारे आमचे मित्र व बाहेर असणारे आमचे मित्र यांनी ठरवले की, कंसाचा वध करायचा. म्हणून सर्वांच्या संमतीनुसार जी मंडळी कंसाचा वध करायला गेली, त्यांचे नेतृत्व मी केलेले आहे !"

हे जे कृष्णाचे वाक्य आहे ते 'आठव्या वर्षी श्रीकृष्णाने कंसाचा वध केला,' हे सांगणारे नाही ! ते थोडेसे शिवाजीशी मिळतेजुळते दिसते. श्रीकृष्ण हा सतरा-अठरा वर्षांचा होता. कंसाला त्याने मारले. कंसाला मारल्यावरोबर तुम्ही जर पुन्हा गणतंत्र आणणार असाल, तर जरासंधाच्या फौजा मथुरेच्या बाजूने येणार ! म्हणून ती कहाणी अशी आहे की कंसाला मारल्यानंतर श्रीकृष्णाने वसुदेवाला बंदीखान्यातून सोडवले, पण राज्य उग्रसेनाला दिले. राजा उग्रसेन झाला आणि उग्रसेनाची सत्ता पुनरपि स्थापन झाली !

श्रीकृष्णाचेच यादवांच्या घरात चालते. कारण तो त्यांचा सर्वांत मोठा लोकप्रिय नेता आहे. जो मुद्दा कृष्ण मांडील, त्या मुद्द्याला त्याच्या संसदेमध्ये बहुमत मिळते. त्यामुळे मंत्रिमंडळ कोणाचेही असले, तरी नाड्या त्याच्या हातात आहेत. याला गादीवर बसण्याची गरज नाही. आपल्या स्वातंत्र्यलढ्यातला महात्मा गांधींची जी भूमिकी आहे, त्याच्याशी मिळती-जुळती अशी ही भूमिका आहे, हे आपण लक्षात घ्या. श्रीकृष्णाने सांगितले की, कंसाला मारले की जरासंधाचा हल्ला होणार. जरासंधाचा हल्ला झाला. श्रीकृष्णाने मोठ्या पराक्रमाने त्याचा हल्ला परतवला आणि आपल्या मंडळींना सांगितले की, 'जरासंधाला अंदाज आला नाही आपली ताकद किती आहे याचा ! म्हणून छोट्या फौजा आल्या. आपण त्या परतवून लावल्या, पण यानंतर मोठ्या फौजा येतील. जरासंधाच्या फौजांसमोर आपण टिकू शकणार नाही. सबंध यादवांना पुन्हा एकदा राजेपण कबूल करावे लागेल. नसेल तर त्यांना संपूर्णपणे वंशासकट नष्ट होईपावेतो मरावे लागेल ! याला पर्याय आहे भूमीचा त्याग !" म्हणून श्रीकृष्णाने आपले सगळे लोक उचलले, ती मथुरा–गोकुळची भूमी सोडली व तो क्रमाने नवीन भूमीचा शोध घेत घेत पश्चिम समुद्राच्या काठाशी द्वारकेला येऊन स्थिर झाला.

कृष्ण हा मथुरेत असेल, तर जरासंधाचे हल्ले होतात. जरासंधाला द्वारकेवर हल्ले करायला काय हरकत आहे ? जरासंध द्वारकेवर हल्ले करू शकत नाही, कारण जरासंधाला द्वारकेवर हल्ले करायचे असले, तर मधले कुरूंचे राज्य ओलांडावे लागते. आणि कुरू हेसुद्धा स्वतःचे राज्य निर्माण करताहेत. त्या काळात कुरूंचा नेता आहे भीष्म ! भीष्माच्या नेतृत्वाखाली कुरूंचे राज्य आहे. पांडव-कौरव अजून वयात आलेले नाहीत. त्यांचे आपापसात धिंगाणे चालू आहेत. भीष्माशी लढाई करायची, कुरूंचे राज्य बुडवायचे आणि द्वारकेवर जायचे– एका पिटुकल्या राज्यासाठी, एवढी किंमत जरासंध देणार नाही, हा श्रीकृष्णाचा



अंदाज असल्याने जरासंधाच्या राज्याच्या जवळ असलेले राज्य त्याने सोडले आणि तो द्वारकेला आला. द्वारकेला आल्यावर सर्व तंत्र बदलले; कारण गोधनावर आधारलेले गणतंत्र आता पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर उभे राहणार नाही. म्हणून पश्चिम किनाऱ्यावर व्यापारावर आधारलेले नवीन गणतंत्र निर्माण करावे लागणार. द्वारका, ओरवा, द्रुग, कच्छ ही पश्चिम किनाऱ्यावरील प्राचीन प्रमुख-केंद्रे आहेत. म्हणून आता नवीन गणतंत्राची मांडणी आयात-निर्यात व्यापाराच्या आधारे झाली, त्यामुळे गणतंत्रच बदलले, राज्यरचना बदलली, मांडणी बदलली. समृद्ध आणि वैभवशाली जीवन द्वारकेमध्ये यादवांना उपलब्ध झाले. म्हणून द्वारका सोन्याची आहे, कारण ते गोपालकांचे गणतंत्र आहे. द्वारका सोन्याची आहे, कारण ते व्यापाऱ्यांचे गणतंत्र आहे.

इतिहासात जो श्रीकृष्ण आहे तो मोडलेले गणतंत्र पुन्हा एकदा स्थापन करणारा, प्राचीन गणतंत्राचा नेता म्हणून आहे. दरिद्री गणतंत्र नवीन भूमीवर नेऊन वैभवशाली गणतंत्र निर्माण करणारा, आपल्या राष्ट्राच्या वैभवाची पाया-भरणी करून ते सगळे वैभव निर्माण करणाऱ्यांचा नेता म्हणूनही आहे. पण इथे जरी तो बसलेला असला, द्वारकेत जरासंध जरी येऊ शकत नसला, तरी जरा-संधाचे मित्र त्याच्यावर हल्ले करतातच. म्हणून आपल्याला द्वारकेच्या इतिहासात कालयवनाचा हल्ला आणि श्रीकृष्णाने त्याचा केलेला पराभव, पौंड्राचा हल्ला, वक्रतुंडाचा हल्ला, शालवाचा हल्ला, सौधाचा हल्ला या घटना दिसतात. हे सगळे जरासंधाचे मित्र, छोटे छोटे मांडलिक राजे आहेत. त्यांनी द्वारका बुडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्रीकृष्ण त्या सगळ्यांना पुरून उरलेला आहे. पण तुम्ही कितीही पुरून उरलात, तरी जोपर्यंत जरासंध जिवंत आहे तोपर्यंत द्वारका सुरक्षित नाही, हे समजण्याइतका श्रीकृष्ण चाणाक्ष आहे. आणि जरासंधाला मारायचे असेल तर आपल्याही हाताशी एक साम्राज्य पाहिजे.

कौरवांचे साम्राज्य जवळ आहे. पण त्यांच्याशी यादवांनी मित्रत्व केले, तर यादवांना कौरवांचे मांडलिक म्हणून राहावे लागेल, म्हणून श्रीकृष्णाची धडपड ज्यांच्या हातात राज्य आहे त्यांची बाजू घेण्याची नाही. ज्यांच्या हातात राज्य नाही त्यांची बाजू घेऊन आपल्या मदतीने त्यांना राजे करण्याची आहे. म्हणजे मैत्री होते. राजकारणामध्ये बलवान आणि दुबळे यांची मैत्री म्हणजे एकाचे स्वामित्व, दुसऱ्याचे मांडलिकत्व ! आमच्या ताकदीवर तुम्हाला राजे करतो, या जोरावर मित्रत्व ! म्हणून कृष्णाने पांडवांचे मित्रत्व स्वीकारून पांडवांना राजे करणे हेच बरोबर आहे आणि पांडवांना कोणीतरी मदतनीस पाहिजे म्हणून त्यांनी कृष्णाला मदतनीस घेणे हे बरोबर आहे. नाही तर कृष्णाला कौरवांचे मित्र होता आले असते, पण कौरवांच्या मित्रत्वात त्याला त्यांचा मांडलिक व्हावे लागले असते. पांड-

यांच्या निमित्ताने कौरवांची प्रतिस्पर्धी सत्ता निर्माण करता येणे शक्य आहे, हे लक्षात आल्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीस्वयंवराच्या निमित्ताने पांडवांना भेटला. त्याच्या आधी तो पांडवांना भेटतच नाही ! कारण त्याच्याआधी द्वारका सुरक्षित नव्हती, जीवन सुरक्षित नव्हते, मथुरेत सुरक्षित नव्हते, द्वारकेत सुरक्षित नव्हते, मग पांडवांना भेटून काय करायचे ? म्हणून पांडव आणि श्रीकृष्ण यांच्या मैत्रीचा पाया दोघांची राजकीय गरज यातून भरला आहे, मग ‘ द्रौपदीशी बंधु शोभे नारायण ! ’ हे सगळे काव्य! हे जे काव्य आहे ते चांगले आहे. ते वाचावे, त्याचा अभ्यास करायला काहीच हरकत नाही. श्रीकृष्ण परमात्मा मानल्यानंतर मग त्याच्या भक्तीच्या कहाण्या सुरू होतात.

एकदा पांडवांनी इंद्रप्रस्थाचे राज्य ताब्यात घेतले की, खांडववन जाळून पांडवांना मुक्त करणे व पांडवांना सांगणे की तुम्ही राजसूययज्ञ करा. पण राजसूय यज्ञ करायचा असेल, तर जरासंधाला मारल्याशिवाय गत्यंतर नाही. जरासंधाला मारण्याची जबाबदारी पांडवांच्या गळ्यात श्रीकृष्णाने अडकवली आहे. पण त्यातही वैशिष्टय आहे. श्रीकृष्ण लढवय्या आहे, पराक्रमी आहे, तसाच तो शूर आहे, धाडसी आहे. पांडवांनी जरासंधाला मारावे, असे त्याचे म्हणणे नाही. पांडवांनी जरासंधाला कसे मारावे हे तो सांगतो; ‘ मी बिनधोक होईन ’, हे तो सांगत नाही. मग तो जरासंधाला मारायला निघाला. कसा निघाला ? अर्जुन, भीम, कृष्ण जरासंधाकडे गेले. महाभारतात याचे वर्णन आहे. हे जरासंधाकडे गेले व त्याला सांगितले की, आम्हांला युद्धभिक्षा पाहिजे. मग श्रीकृष्ण जरासंधाला भीमाशी लढवतो. एकवीस दिवस भीम व जरासंध यांचे युद्ध झाले, पण जरासंध थकेचना– तेव्हा श्रीकृष्णाने हळूच भीमाला सांगितले की, पायापासून चीर म्हणजे इकडचा तुकडा इकडे, तिकडचा तुकडा तिकडे ! मग जरासंध मेला !

महाभारतात इतकेच वर्णन आहे असे नाही. महाभारतात याखेरीज काही वर्णन आहे. त्यातले एक वर्णन असे की, श्रीकृष्ण, भीम, अर्जुन राजगृहात गेले ते वेष पालटून गेले, मूळच्या वेषात गेले नाहीत. रात्रीच्या वेळी गेले, दिवसा गेले नाहीत. याचेही महाभारतात वर्णन आहे. गेल्याबरोबर निरनिराळ्या वेशीवरचे नगारे त्यांनी आधी फोडून टाकले हेही वर्णन आहे. नंतर जरासंधाच्या राजगृहात जाऊन त्याला बोलावले. मग पुढे एकवीस दिवस लढाईचे वर्णन, मग जरासंधाचा मृत्यू, त्याचे प्रेत कपडयाने झाकून नगराच्या वेशीत त्यांनी ठेवले, जरासंधाचा तुरुंग फोडून कैदेत असलेले राजे मोकळे सोडून दिले व दिवस उजाडायच्या आत गिरिव्रज ओलांडून एका डोंगराच्या पायथ्याशी आपल्या छोटयाशा सैन्यासह, हल्ला आला तर प्रतिकार करण्याच्या तयारीत सज्ज होऊन तिघेही उभे राहिले. याचेही वर्णन आहे. याचा अर्थ हा आहे की, वेचक अशी हजार-पाचशेची फौज घेऊन हे



गिरिव्रजाच्या पायथ्याशी गेले. वेष पालटून जरासंधाच्या राजधानीत गेले, त्याला बाहेर काढून त्याचा वध केला. तुरुंग फोडून राजांना मोकळे केले, प्रेत वेशीवर ठेवले. आपण बाहेर येऊन उभे राहिले ! दुसऱ्या दिवशी जेव्हा हे कळेल की, जरासंध मेला आहे, राजे मोकळे सुटलेले आहेत. तेव्हा राजधानीत एकच धुमाकूळ उडेल. इतक्यातून जर कोणी प्रतिकार करायचा प्रयत्न केला, तर आपण तयारीत आहोतच. प्रतिकार न करता सर्वांनी शस्त्र खाली ठेवले, तर जरासंधाचे राज्य पांडवांचे मांडलिक म्हणून स्वीकारण्याची तयारी आहे. राजकीय खुनाचा हा भाग आहे. अगदी सभ्य भाषेत सांगायचे, तर भगवंतांनी जरासंधाचा खून केलेला आहे ! दुसरे काही नाही. पुढचे काव्य आहे. एकवीस दिवसांची लढाई झाली, आकाशात देवता होत्या, भीम थकू लागला, जरासंध थकेचना, मग जरासंधाला चिरून इकडचा भाग इकडे, तिकडचा भाग तिकडे केला, हे सगळे उद्योग, हा कवितेचा भाग आहे, इतिहासाचा भाग नाही.

एकदा जरासंध मेला आणि त्याचा मुलगा सहदेव मांडलिक झाला, की पांडवांच्या राजसूययज्ञाची वाट मोकळी झाली. पांडव सम्राट झाले ते कृष्णाच्या मदतीने. पांडव सम्राट होत असताना द्वारका सोन्याची झाली, सुरक्षित झाली ती कृष्णाच्या धोरणाने ! म्हणून हे एका राष्ट्रनिर्मात्याचे चरित्र आहे. पण त्यात लबाडया थोडया नाहीत. कारण श्रीकृष्णाने पांडवांना राजा केले. इथेच तो थांबला नाही, तर त्याने अर्जुनाला आपली बहीण पळवून नेण्याचा सल्ला दिला. हे सुभद्रास्वयंवर ही नंतरची बाब आहे.

मूळच्या कहाणीत सुभद्रेचे हरण राक्षसविवाहाच्या पद्धतीने झाले. महाभारतात भूमिकाच अशी आहे की, कृष्ण आणि अर्जुन बोलत होते. बोलता बोलता कृष्णाने अर्जुनाला विचारले–

श्रीकृष्ण : माझ्या बोलण्याकडे तुझे लक्ष नाही !

अर्जुन : खरे आहे.

श्रीकृष्ण : समोरची देखणी मुलगी पाहिल्याने तुझे चित्त चंचल झालेले आहे.

अर्जुन : (लाजला) खरे आहे.

श्रीकृष्ण : तुला माहीत आहे का कोण आहे ती ? ती माझी बहीण आहे ! हा रथ, ही बहीण, उचल आणि पळ !

अर्जुन : हे कशाकरिता करू ? आज ना उद्या स्वयंवर होईल, स्वयंवराला मी येईन व सुभद्रेशी लग्न करीन.

श्रीकृष्ण : वेडा आहेस ! बायकांचा काही नेम नाही. स्वयंवरात त्या कोणाच्या गळयात माळ घालतील, याचा नेम नाही. म्हणून ती वेळ येण्याच्या आत बाई पळवून न्यावी हे शहाणपणाचे आहे !

अर्जुनाने श्रीकृष्णाचा सल्ला ऐकला व त्यानुसार त्याने सुभद्रा रथात घातली व पळवून नेली ! बलरामाला संताप आला. श्रीकृष्ण म्हणाला, " जे झाले ते योग्य झाले. तेच अंतिमतः यादवांच्या कल्याणाचे आहे !" आपल्याला माहीत असावे की, युधिष्ठिर हा पांडवांचा वडील भाऊ आहे. द्रौपदी ही पांडवांची पट्टराणी होती, पण राज्याचा वारसा सुभद्रेच्या मुलाकडे आला ! अर्जुनापासून सुभद्रेला झालेला अभिमन्यू– अभिमन्यूचा मुलगा परिक्षिती हा गादीवर बसतो. परिक्षितीचा मुलगा जनमेजय याच्याकडे वारसा आलेला आहे. उरलेल्यांकडे वारसा गेलेलाच नाही, बाकीचे कोणी जिवंतच नव्हते, हे काव्य चांगले आहे.

श्रीकृष्ण हा आपल्या साह्याने राज्य निर्माण करतो, हे तर खरेच आहे, पण निर्माण केलेले राज्य पुन्हा आपल्या वंशाशी जोडून घेण्याचा प्रयत्न करतो, हेही खरेच आहे. असा हा श्रीकृष्ण जरासंधाला मारण्याची योजना करणार, जरासंधाला अनुकूल असणारे भीमक आणि शिशुपाल हे जर आपापसात लग्न करून सोयरे होणार असतील, तर मध्येच सोय साधून त्यांची मुलगी पळवणार आणि त्यांची नाचक्की करणार, आणि पुन्हा वर जरासंधाला खिजवणार की, " आम्ही तुमची मुलगी पळवली तरी तुम्ही आमच्यावर हल्ले करणार नाही इतके तुम्ही दुबळे आहात !" हे श्रीकृष्ण करणार आणि हे करीत असताना जसे राज्य उभे करण्याचे काम तो करणार तसेच लढाईतून निवृत्त होऊन सल्ले देण्याचे कामही तो करणार, हे अगदी उघड आहे !

हा श्रीकृष्ण राज्यकर्ता पुरुष आहे. जेव्हा द्वारका बुडाली, तेव्हा आपल्या सगळ्या स्त्रिया त्याने अर्जुनाच्या हवाली केल्या– ज्या चोरीला गेल्या. पण चोरांनी लुटल्यानंतर जे शिल्लक राहिले, ते घेऊन अर्जुन मथुरेत गेला व मथुरेत यादवांचे नवे राज्य त्याने स्थापन करून दिले ! तिथे कृष्ण वंशातला व्रज नावाचा माणूस यादवांचा राजा झाला व यादवांचा वंश मथुरेत पुन्हा सुरू झाला. ही गोष्ट फारशी प्रसिद्ध नाही. दिसते ते असे की, कृष्णाने द्वारकेला राज्य निर्माण केले. जरासंधाला मारले, द्वारकेचे राज्य समृद्ध केले, पांडवांना सम्राट केले व त्या सगळ्यांबरोबर एक समझोता केला की मथुरेची भूमी आम्हांला मिळाली पाहिजे. हाही एक उद्योग कृष्णाने केलेला आहे !

एका कर्तबगार नेत्याच्या आधारे दरिद्री, सामान्य, कलांच्या परंपरा, नृत्यांच्या परंपरा असणाऱ्या गोपालकांच्या गणतंत्राचे वैभवशाली द्वारकेत रूपांतर, एका मुत्सद्दी नेत्याच्या जोरावर जुन्या साम्राज्याची समाप्ती, नव्या साम्राज्याचा आरंभ हा कृष्णचरित्रातला मानवी ताकदीचा, शक्तीचा विलास दाखविणारा भाग आहे. एक सम्राट, एक मुत्सद्दी एक राज्य बिनधोक करू शकतो; पण राज्य बिनधोक झाले म्हणजे माणसे बेजबाबदार होतात. त्यांचा नाश असाधारण शक्तीचा युगपुरु-



षही टाळू शकत नाही ! हा कृष्णाच्या मर्यादेचा भाग आहे. या राज्यात पैसा भरपूर आहे, संपत्ती भरपूर आहे, भोगाची साधने भरपूर आहेत आणि भीती कोणाचीच राहिली नाही ! ते आपापसात मारामाऱ्या करीतच राहणार ! तेही कृष्णाने भोगलेले आहे, म्हणून कृष्णाचे चरित्र लक्षात घेऊन त्या जुन्या काळात श्रीकृष्ण हा समाजाचा एक आदर्श नेता म्हणून लोकांच्यासमोर उभा राहिला अन् मग त्याच्या कौतुकाची गाणी सुरू झाली, त्याबरोबर नानाविध कहाण्या आल्या. मग हा श्रीकृष्ण देव मानला जाऊ लागला. एकदा देव मानला की मग तो तत्त्वज्ञानाचा प्रवक्ताही मानला जाऊ लागला. पराक्रमी पुरुष, आदर्श नेता, हीरो, जवळजवळ देव, पूर्ण देव, परमेश्वर, तत्त्वज्ञानाचा प्रवक्ता, अनासक्त, वैराग्यशाली, कलांचा आधार असे क्रमाने चरित्र वाढत चाललेले आहे. पण पुढचा सबंध विकास आपण काव्य म्हणून बाजूला सारले, तरी ते एका अफाट कर्तृत्व असणाऱ्या, असामान्य संयम, अनासक्ती असणाऱ्या, असामान्य बुद्धिमत्ता असणाऱ्या एका गणतंत्राच्या निर्मात्याच्या प्राचीन नेत्याचे चरित्र आहे. म्हणून पाणिनीने असा उल्लेख केलेला आहे की, जुनी ऐतिहासिक माणसे कधीतरी लोकांना प्रिय होत होत ईश्वरच होऊन जातात. याचे सगळ्यात चांगले उदाहरण म्हणजे वासुदेव व अर्जुन ! आता त्यांची पूजा व्हायला लागली आहे, कारण पाणिनीला हे माहीत आहे की हा इतिहासातला माणूस असून आता लोक याला देव मानायला लागले आहेत.

हा जो कृष्ण आहे, तो आपण समजून घ्यायला पाहिजे. यात आपण क्रमाने टप्पे घालायला लागलोत–

कृष्ण : राजकारणी नेता म्हणून– ख्रिस्त शकापूर्वी १०० वर्षे.
कृष्ण : ईश्वराच्या पातळीच्या निकट म्हणून– ख्रिस्त शकापूर्वी ४०० वर्षे.
कृष्ण : देव म्हणून– ख्रिस्तोत्तर २०० वर्षांनी.

तिथून वैष्णवांच्या परंपरा, याच आरंभात कुठेतरी सगळ्या उपनिषदांचा सारांश असणारी ' भगवद्गीता ' कृष्णाच्या तोंडी, कृष्ण हा दार्शनिक, मुत्सद्दी, राजकारणी बनला ह्याचा आरंभ ! पण मूळच्या यादवांच्या गणतंत्राच्या परंपरा आहेत. त्यामुळे त्यांच्या राज्यातील स्त्री-पुरुष घरी आल्यानंतर चांदण्या रात्री कार्तिक-मार्गशीर्षात नदीच्या काठी जाऊन नृत्य-गीतांचा आनंदोत्सव साजरा करतात, त्या परंपरा चालत आल्या, म्हणून हरिवंशात श्रीकृष्ण, बलराम सगळे यादव, सगळे गोप, पुरुष, स्त्रिया यमुनेच्या काठी नाचतात ! त्यांतील उरलेले पुरुष बाद करून टाकले आणि एकटा कृष्ण तिथे ठेवला की रासक्रीडा सुरू होते. असे क्रमाने कलोपजीवी परंपरेचे रासक्रीडा हे काव्य ! रासक्रीडेत एकच श्रीकृष्णाची प्रेयसी आहे जी कृष्णाच्या तत्त्वज्ञानाचा आधार होते, ती राधा ! क्रमाने ही मिथक एका मुत्सद्द्याच्या मिथकात रूपांतरित होते, ही मिथक पुन्हा देवतांच्या मिथकामध्ये रूपांतरित होते, देवतेची

मिथक परमात्म्याच्या मिथकात रूपांतरित होते. नंतर सगळ्या कलांना, शृंगार-भक्तीला आधार म्हणून ते विकसित होते. म्हणून इतिहासातील पुरुष हे सर्व कलांना, संस्कृतीला, तत्त्वज्ञानाला आधार कसे होतात, हे पहायचे असेल तर ख्रिस्तपूर्व ८०० ते ख्रिस्तोत्तर ९००, हा १७०० वर्षांचा असा प्रवास करावा लागेल! मिथकमध्ये क्रमाने उत्तरकालीन कविता बाजूला सारून इतिहासापर्यंत जायचे असेल, तर ख्रिस्तोत्तर ९०० ते ख्रिस्तपूर्व ८०० हा उलटा प्रवास करावा लागेल. हा प्रवास करताना त्यात गणतंत्राचा नेता सापडतो, मातृसत्तेचा नेता सापडत नाही, तत्त्वज्ञानाचा प्रवक्ता सापडतो, पण वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार असणारा सापडत नाही. शेवटी कृष्ण हा गवळ्यांचा देव आहे आणि राज्य नसणाऱ्यांना राज्य देणारा आणि जनतेचे राज्य निर्माण करणारा गणतंत्राचा नेता आहे. कृष्णाच्या तोंडी उमटलेले सगळे विचार तो परमात्मा झाल्यावर बसवले जातात, हे लक्षात घेतले, तर आपण कृष्णचरित्राकडे अधिक मोकळेपणाने पाहू शकू, असे वाटते.

□